# नेत्यांनो, जिल्ह्याला अजून किती भकास करणार..?



सोनारी येथे काळभैरवनाथाच्या यात्रेनिमित्त रंगली कुस्त्यांची दंगल

>> सविस्तर वृत्त पान ३

दैनिक
# आरंभ मराठी
arambhmarathi535@gmail.com
■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 79 ■ मंगळवार,29 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5




शिराढोणची पी.एम.श्री जिल्हा परिषद शाळा तालुक्यात अव्वल

>> सविस्तर वृत्त पान ४

# टक्केवारी अन् राजकीय वर्चस्ववादातून रुतला विकासाचा गाडा

## महिना उलटला,२६८ कोटींच्या कामांवरील स्थगिती कायम - टक्केवारी घेणाऱ्या पालकमंत्र्यांच्या तथाकथित स्वीय सहायकाची चौकशी का नाही?

आरंभ मराठी । धाराशिव

**दहा वर्षांपासून आकांक्षीत जिल्हा म्हणून जिल्ह्याची असलेली ओळख पुसण्यासाठी कुणीही पुढाकार घेताना दिसत नाही, किंबहुना टक्केवारी, राजकीय वर्चस्ववादातून नैसर्गिक न्यायाने जिल्हा नियोजन समितीतून होणारा विकासही थोपवला जात आहे. एकीकडे जिल्ह्याला मंत्रीपद नाही, त्यामुळे पालकमंत्रीपद जिल्ह्याबाहेर जात आहे.त्यात प्रत्येक कामांमध्ये टक्केवारीची संस्कृती आली आहे.जिल्हा नियोजन समितीच्या कामांमध्ये भाजपपेक्षा शिवसेना आणि विरोधी लोकप्रतिनिधींचा अधिक लाभ होत असल्याचे लक्षात आल्यानंतर या कामांना मुख्यमंत्र्यांच्या सूचनेवरून महिन्यापूर्वी स्थगिती देण्यात आली आहे. दुसरीकडे पालकमंत्र्यांच्या तथाकथित स्वीय सहायकाने टक्केवारी घेऊन कामे वाटप केल्याची चर्चा आहे. मात्र, अशा पध्दतीने कामांचे वाटप करणाऱ्या स्वीय सहायकाची चौकशी का केली जात नाही,अशा लोकांमुळे जिल्ह्याच्या विकासाचा गाडा का थांबवला जात आहे, असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.**

सरकार कुणाचेही असो, राजकीय वर्चस्ववाद, श्रेयवाद ठरलेला. विकासकामांवरून बॅनरबाजी करणारे, श्रेय घेणारे नेते तुलनेने विकास घडवून आणत नाहीत. त्यामुळे विकास होण्याऐवजी वर्षानुवर्षे जिल्हा भकास होतो आहे. नोव्हेंबरमध्ये राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन झाले. जिल्ह्यातील दोन आमदार सत्तेत आहेत. मात्र, मंत्रीपद न मिळाल्याने ठाण्यातील मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे. सरनाईक हे अत्यंत धडाडीचे, कार्यक्षम मंत्री असून, त्यांनी त्यांच्या कामांची झपाटा सुरू केला होता.मात्र, काही महिन्यांतच त्यांच्या कामांना ब्रेक लागला.कारण जिल्ह्यातील भाजपच्या लोकप्रतिनिधीने तसेच एका पदाधिकाऱ्याने त्यांची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आणि जिल्हा नियोजन समितीच्या २६८ कोटींच्या कामांनाही स्थगिती देण्यात आली. त्यामुळे सरनाईक निराश आहेत.त्यांच्या एका तथाकथित मुंबईस्थित स्वीय सहायकाने पालकमंत्र्यांच्या वाट्याला आलेल्या कामांचे टक्केवारी घेऊन वाटप केल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्हा परिषदेसह विविध विभागातून संबंधित अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून या कामांची टक्केवारी घेऊन विक्री झाली असून,त्यासाठीची आगाऊ रक्कमही घेतली गेल्याचे सांगण्यात येत आहे.ही गंभीर बाब देखील मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचल्याचे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केली जावी, अशी मागणी पुढे येत आहे.

## अण्णांच्या उपोषणाचे काय ?



जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देण्यात आल्यानंतर शिवसेनेचे जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर गंभीर आरोप करत २१ एप्रिलपर्यंत कामांवरील स्थगिती न उठवल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा पत्रकार परिषद घेऊन दिला होता.मात्र, त्यांनी उपोषणही केले नाही आणि कामांवरील स्थगिती कायम आहे. भाजप आमदार राणा पाटील सत्तेतील आमदार असल्याने त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे होतील, अशी अपेक्षा होती. मात्र,प्रत्यक्षात त्यांचाही कामांतून प्रभाव दिसत नाही.आमदार डॉ.तानाजी सावंत हे निवडणूकीच्या निकालापासून मतदारसंघाकडे फिरकलेच नाहीत.त्यामुळे त्यांच्यावरही मतदार प्रचंड नाराज आहेत.

## मूलभूत सुविधांसाठी निधी, श्रेयवाद कशाला ?



जिल्ह्यातील विकास कामांसाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी दरवर्षी निश्चित केला जातो. यामध्ये सरकार कुणाचेही असले तरी जिल्ह्याचा विकास निधी ठरलेला असतो.मात्र,यातही श्रेयवाद, वर्चस्ववाद आणि टक्केवारी सुरू आहे. राजकीय साठमारीत धाराशिव जिल्ह्याचा विकास रुतला असून, राजकीय अनास्था, कुरघोड्या आणि आरोप प्रत्यारोपामुळे विकासाला गती मिळणार की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## श्रेयवादातून यापूर्वीही कामांना स्थगिती

जिल्ह्यासाठी विशेष निधी आणून विकास करण्याऐवजी नैसर्गिक न्यायाने आलेल्या निधीसाठी राजकीय कुरघोड्या, श्रेयवाद सुरू आहे.त्यामुळे धाराशिव शहरासह जिल्ह्याची अवस्था अक्षरश: बकाल होत आहे.यापूर्वीही धाराशिव शहरातील वेगवेगळ्या विकास कामांना सरकारे बदलली की स्थगिती देण्यात आली होती.अशी कोट्यवधी रूपयांची कामे प्रलंबित आहेत.त्यामुळे विशेषत: धाराशिवकर रस्ते, नाल्या,पथदिवे, अशा मूलभूत प्रश्नांसाठी झगडत आहेत. ३ वर्षांपासून शहरातील रस्त्यांचे हाल सुरू आहेत. आठवडी बाजार विकासकामे, राजमाता जिजामाता उद्यान, संभाजी महाराज उद्यान, बाळासाहेब ठाकरे उद्यान यासारख्या कामांना दिलेली स्थगिती कायम आहे.

# जिसकी लाठी, उसकी भैंस हे चालणार नाही !

## खासदार ओमराजे निंबाळकर यांचा संताप, तुळजापूरचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर जोरदार टीका

### तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यावरून पुजाऱ्यांसोबत बैठक, सत्तेचा माज योग्य नाही

आरंभ मराठी । धाराशिव



जिसकी लाठी, उसकी भैंस हे चालणार नाही ! सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांना सत्तेचा माज आला आहे. हा माज योग्य नाही. तुळजाभवानी माते यांना सदबुध्दी दे, अशा शब्दांत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर सडकून टीका केली.तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी संताप व्यक्त केला.यावेळी तुळजापुरातील पुजाऱ्यांनी आराखड्यासंदर्भात काही बदल सूचविले.या बदलाची नोंद घ्यावी, अशाही सूचना खासदार ओमराजे यांनी केल्या.

तुळजापुरात १८०० कोटींचा विकास आराखडा राबविण्यात येत आहे. या आराखड्यात अनेक प्रकारच्या त्रुटी असून, पुजारी वर्गाला विश्वासात घेतले नसल्याची तक्रार आहे. यानुषंगाने खासदार ओमराजे यांनी सोमवारी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात विकास आराखड्यासंदर्भात बैठक घेतली. यावेळी आमदार कैलास पाटील, जिल्हाधिकारी तथा तुळजाभवानी मंदीर संस्थानचे अध्यक्ष किर्ती कुमार पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, अप्पर पोलिस अधीक्षक शफकत आमना, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, पुरातत्व विभागाचे अधिकारी, तुळजाभवानी मातेचे पुजारी धीरज पाटील, बिपीन शिंदे, परमेश्वर कदम, प्रा.लोंढे,नागनाथ भांजी, ऋषी मगर, शाम पवार यांच्यासह तुळजापुरातील व्यापारी उपस्थित होते. यावेळी पुजारी बांधवांनी आराखड्यासंदर्भात विविध विषय मांडले.त्यात तुळजापुरातील रहिवाशी विस्थापित होऊ नयेत, आराखडा राबवताना भाविकांना कुलाचार, परंपरा, विधी करताना कुठेही अडथळे आणले जाऊ नयेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. मंदीर परिसरात होत असलेल्या विकास कामांमुळे पुरातन मंदिरात काही बदल करण्यात येत आहेत. त्यात मंदिराच्या भोवती असलेल्या ओवऱ्या काढल्या जाणार असून, भाविकांनी कुलाचार कसे करायचे, असा प्रश्न पुजाऱ्यांनी केला. त्यानंतर आर्किटेक्चर कंपनीच्या प्रतिनिधींनी ओवऱ्या काढल्या जाणार नसून, त्यात सुधारणा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच आराधवाडी भागात नियोजित असलेल्या ९५ टक्के विकास कामांची जागा पुजाऱ्यांच्या मागणीवरून बदलण्यात आल्याचे सांगितले. तुळजापुरातील पुजाऱ्यांसोबतच व्यापारी वर्गानेही विविध मागण्या केल्या. स्थानिकांच्या मागण्या ऐकून घेऊन विकास करण्यासाठी कुणाचाही विरोध नाही, मात्र मंदीर प्रशासनाने पुजाऱ्यांना तसेच व्यापाऱ्यांना विचारात घ्यावे,कुणाच्याही भावनेचा अनादर होऊ नये, अशा सूचना खासदार ओमराजे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

### १०८ फुट मुर्तीच्या जागेबाबत आक्षेप

या बैठकीत जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजारी यांनी विकास आराखड्याचे सादरीकरण केले. यावेळी पुजारी बांधवांनी रामदरा तलावानजिक उभारण्यात येणाऱ्या १०८ फुट उंचीच्या देवीच्या मुर्तीबाबत आक्षेप नोंदवला. या मुर्तीमध्ये आणि कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या मुर्तीमध्ये साधर्म्य नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यानंतर खासदार ओमराजे यांनीही यात दुरूस्ती करण्याची सूचना मंदीर संस्थानला केली. तसेच अशा प्रकारचे शिल्प रामदरा परिसराऐवजी शहराच्या पूर्व बाजूला उभारले जावे, अशी मागणी पुजाऱ्यांनी केली.

# शेतीच्या कारणावरून दिव्यांग महिलेच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला

आरंभ मराठी । लोहारा



मुलीच्या नावे शेती का करत नाही, असे म्हणत एका कुटुंबावर चौघांनी हल्ला केला. या हल्ल्यात दिव्यांग पत्नी, तिचे पती आणि मुलगा जखमी झाले. ही घटना लोहारा तालुक्यातील होळी येथे घडली. याप्रकरणी लोहारा पोलिस ठाण्यात बुधवारी (ता. २३) चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या पोलिसांकडून माहितीनुसार तालुक्यातील होळी येथील नानासाहेब भुजंगराव पाटील (वय ५६) यांची शेती आहे. यातील काही एकर शेतजमीन मुलीच्या नावे करण्याच्या कारणावरून आरोपी बबन गायकवाड, विशाल बबन गायकवाड, (सर्व रा. तोरंबा, ता. तुळजापूर) यांनी रविवारी (ता. २०) सायंकाळी नानासाहेब पाटील यांच्याशी वाद घातला. त्यानंतर आपल्याच गावातील गावगुंडासोबत येऊन होळी यांच्या घरात घुसून शिवीगाळ करीत पाटील व त्यांच्या दिव्यांग पत्नी सुमन यांना लाथाबुक्क्यांनी, विळा व लोखंडी पाइपने जबर मारहाण केली. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी पुढे आलेला त्यांचा मुलगा किसन यालाही आरोपींनी मारहाण करून जखमी केले. यावेळी जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी नानासाहेब पाटील यांच्या फिर्यादीवरून लोहारा पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध मारहाणीसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये बबन गायकवाड, विशाल बबन गायकवाड,अमोल गायकवाड, जयकुमार कदम या चौघावर गुन्हा नोंद करण्यात आला. या प्रकरणाची चौकशी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक केंद्रे यांच्या कडे देण्यात आला आहे.

## उमरगा तालुक्यातील मुलीवर लैंगीक अत्याचार

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील एका गावातील २८ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. डिसेंबर महिन्यापासून ते आतापर्यंत तरुणीवर गावातील एका तरुणाने मारहाण करून बलात्कार केला. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीने तरुणीला मित्राच्या कारमध्ये घेवून जावून शेतात तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच तरुणीला गरोदर करण्यास कारणीभुत ठरला. पीडित तरुणीने दिनांक २६ एप्रिल रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ६४(२), ८७, ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३(५) कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पवनचक्की कंपनीचे दीड लाखांचे कॉपर केबल चोरीला

आरंभ मराठी । वाशी



पवनचक्की कंपनीचे दीड लाख रुपये किंमतीचे कॉपर केबल अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याची घटना घडली. दिनांक २१ एप्रिल वाशी तालुक्यातील सारोळा शिवारातील सेरेंटीक रिन्युएबल्स इंडीया ५ प्रा. लि.कंपनीच्या लोकेशन नं सी आर ३२ पवनचक्कीच्या आत मधील १६२ फुट लांबीची कॉपर केबल अंदाजे १,५१,१४० रुपये किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. तसेच कंट्रोल पॅनलची तोडफोड करुन नुकसान केले. परमेश्वर मनोहर चेडे (वय ५७ वर्षे, रा.वाशी) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२), ३२४(१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# जुन्या ड्रग्ज प्रकरणाचा होणार नव्याने तपास

## माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मागणीला यश

आरंभ मराठी । धाराशिव



दीड वर्षापूर्वी परंडा पोलिसांना सापडलेल्या ड्रग्ज प्रकरणाचा पुन्हा नव्याने तपास करण्यात येणार आहे. बार्शी ड्रग्ज प्रकरणी परंडा येथील आरोपी मोठ्या संख्येने सापडल्यानंतर माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सुजितसिंह ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन ड्रग्ज प्रकरणावर ठोस भूमिका घेऊन या प्रकरणातील आरोपींना पाठीशी न घालता त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी भूमिका मांडली होती. त्याचसोबत परंडा येथील जुन्या ड्रग्ज प्रकरणाचा पुन्हा नव्याने तपास करावा अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या मागणीनंतर परंडा येथील जुन्या ड्रग्ज प्रकरणाचा पुन्हा एकदा तपास करावा अशी भुमिका घेत पोलीस विभागाने तपासासाठी लेखी पत्र दिले आहे. परंडा येथे १९ जानेवारी २०२४ रोजी पोलिसांना दोन व्यक्तींकडे ड्रग्जसदृश्य पदार्थ सापडला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करून २९ फेब्रुवारी २०२४ रोजी तो पदार्थ ड्रग्ज आहे का हे तपासण्यासाठी सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात आला होता. त्याचा रिपोर्ट १५ डिसेंबर २०२४ रोजी प्राप्त झाला होता. त्या रिपोर्टनुसार तो पदार्थ कॅल्शियम क्लोराईड असल्याचे सांगितले होते. तसेच या प्रकरणातील दोन आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी पुरावा नसल्याचे सांगत हा गुन्हा गैरसमजुतीने दाखल झाला असुन तो रद्द करावा अशी भुमिका घेत कोर्टात क समरी अहवाल दाखल केला होता. आता पुन्हा एकदा ही केस ओपन करून याचा सखोल तपास करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे या प्रकरणात आणखी किती आरोपी निष्पन्न होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पाच दिवस हरीनामाने दुमदुमला तेरणा काठ

## काल्याच्या किर्तनानंतर दिंड्या, पालख्या निघाल्या परतीच्या वाटेवर

आरंभ मराठी । तेर

तेर येथील संत गोरोबाकाकांच्या संजीवन समाधी सोहळ्याची सांगता नृसिंह मंदीरातील काल्याच्या किर्तनाने झाली. गोपाळकाला घेऊन वारकरी आणि फडकरी परतीच्या वाटेवर निघाले. दशमीला आलेले भाविक एकादशीचा उत्सव, नगरप्रदक्षिणा, द्वादशी व त्रयोदशीला काकांचा पुण्यतिथी सोहळा साजरा करून रविवारी (दि.२७) नृसिंह मंदीरातील काला घेऊन परतीच्या वाटेवर निघाले. नृसिंह मंदिरात काल्याची किर्तनसेवा पार पडली. गेल्या पाच दिवसापासून तेरणाकाठ हरीनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता तसेच भक्तांच्या गर्दीने फुलून गेला होता. काकांच्या वार्षिक समाधी सोहळ्याची यात्रा दोन टप्प्यात भरते. दशमी ते अमावस्या या टप्प्यात सर्वत्र हरीनामाचा जागर तर अमावस्या ते अक्षयतृतीया हा यात्रेचा दुसरा टप्पा असतो. उद्या (दि.३०) अक्षयतृतीया असून, या दिवशी पुन्हा एकदा भाविकांची गर्दी होणार आहे. यंदाचा यात्रा उत्सव गोरोबाकाका व शिव मंदिर ट्रस्टच्या प्रशासक रूपाली कोरे, तहसीलदार मृणाल जाधव मंदिर समितीचे निरीक्षक अतुल नळणीकर यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. यात्रेसंबंधी व्हाट्सएप ग्रुपवर दररोज माहिती घेतली जात होती.





### ग्रामपंचायतीचे सुयोग्य नियोजन

ग्रामपंचायतीच्या वतीने यात्रेकरूसाठी पिण्याचे पाणी, स्नानासाठी महिला व पुरुष यांच्या साठी स्वतंत्र व्यवस्था, सी.सी.टी.व्ही, मोफत पार्किंग व्यवस्था आदी सोई चांगल्याप्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे यांच्यासह ग्रा.प. सदस्यांनी भाविकांना कुठल्याही समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही यासाठी प्रयत्न केले.

### पालख्या आपापल्या गावी परतल्या

नृसिंह लक्ष्मी मंदिरात गोपाळ काल्या निमित्ताने नृसिंह मूर्तीस उटी चढवून आभुषणे घालून मुर्ती आकर्षक सजविण्यात आली होती. गोपाळकाल्यानंतर सोहळ्यात सहभागी झालेल्या दिंड्या पालख्या आपापल्या गावी परतल्या. गोपाळकाल्याच्या निमित्ताने नृसिंह मुर्ती उटी चढवून सजविण्यात आली होती. मंदिर समितीच्या वतीने किर्तनकार महाराजांचे समितीचे व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांनी स्वागत केले.

# जिल्ह्यात ११ हजार हेक्टर क्षेत्राला झाला ''गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार'' योजनेचा फायदा

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यात ''गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार'' योजनेअंतर्गत २०२४-२५ या वर्षात २६९ जलसाठ्यांमधून तब्बल १ कोटी १० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. गाळ काढण्याचे काम अशासकीय संस्थांनी केले असून, सुमारे १० हजार शेतकऱ्यांनी स्वखर्चाने गाळ वाहून नेऊन ११ हजार हेक्टर क्षेत्रावर पसरवला आहे. या उपक्रमामुळे मुरमाड व खडकाळ जमीन सुपीक झाली असून, ८८०० घनमीटर पाणीसाठा पुनर्संचित करण्यात यश आले आहे. शासन अशासकीय संस्था व ग्रामपंचायतींना मशीन व इंधन भाडे देणार आहे. तसेच अल्पभूधारक तसेच विधवा, अपंग व आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकऱ्यांना गाळ वाहून नेण्यासाठी अनुदान मिळणार आहे. योजनेंतर्गत वाढलेली जलसाठ्यांची क्षमता व जमीन सुपीकतेत झालेली सुधारणा जिल्ह्यातील कृषी उत्पादनात मोठी वाढ घडवून आणण्यास मदत करणार आहे. जिल्ह्यातील ११ हजार हेक्टर क्षेत्राला योजनेचा फायदा झाला असून, पुढील काळात हे क्षेत्र आणखी वाढणार आहे.



## तेजोमय भविष्याच्या दिशेने प्रवास..

देशाची ऊर्जास्वयंपूर्णतेकडे वेगवाने घोडदौड सुरु सुरू असताना, महाराष्ट्रही त्या दिशेने निर्णायक पावले उचलत आहे. गेल्या काही दशकांत ऊर्जेच्या बाबतीत देशभरात जे चित्र होते, ते अतिशय अंधकारमय असेच होते. विशेषतः काँग्रेसी कार्यकाळात तर विजेच्या क्षेत्रातील अंधार अधिकच गडद झाला होता. ग्रामीण भागांतील आठ–आठ तासांचे लोडशेडिंग, शेतकऱ्यांना केवळ मध्यरात्री मिळणारी अपुरी वीज, वीजचोरी, विजेचा अनियमित पुरवठा तसेच महावितरणचे अपुरे वीज उत्पादन हे महाराष्ट्रातील जनतेसाठी जणू नित्याचेच झाले होते. तथापि, आता महाराष्ट्र सौरऊर्जेच्या माध्यमातून एक नवसंक्रमण अनुभवत असून, केंद्र आणि महायुती सरकारच्या दूरदर्शी धोरणांमुळे विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली उभारलेल्या 'राष्ट्रीय सौरऊर्जा मिशनमुळे हे शक्य झाले आहे. राज्यात सौरऊर्जेची ८ हजार, ४५० मेगावॅट उत्पादन क्षमता उभी राहिली असून, हे केवळ आकडे नव्हेत, तर भविष्यातील ऊर्जासुरक्षेची ग्वाही आहे. याच राज्यात एका वेळेस अशी परिस्थिती होती की, पंतप्रधान राजीव गांधी यांना केंद्र सरकार गरिबांसाठी पाठवलेला एक रुपया जनतेपर्यंत पोहोचता पोहोचता त्यांच्या हाती केवळ १५ पैसे पोहोचतात, असे जाहीरपणे म्हणावे लागले होते. हे काँग्रेसी धोरणांची अपयश होते. काँग्रेसने भरघोस घोषणा दिल्या, पण त्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नसे. ऊर्जेच्या बाबतीतही अशीच परिस्थिती होती. काँग्रेस काळात शेतकऱ्यांना शेतीसाठी फक्त रात्री वीज मिळत असे, तीही अनियमित. परिणामी, कृषी उत्पन्न घटले आणि शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर भाजपप्रणित सरकारने ऊर्जेच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. महाराष्ट्र सरकारने २०१५ साली अक्षय ऊर्जा धोरण जाहीर केले आणि २०२० साली त्याला अधिक व्यापक स्वरूप दिले. केंद्र सरकारच्या सहकार्याने राबवलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ही त्यातील एक प्रमुख योजना ठरली. या योजनेअंतर्गत सात हजार मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभे राहत असून, त्यामुळेच शेतकऱ्यांना दिवसाही अखंडित वीज मिळू लागली, ही गोष्ट क्रांतिकारीच ! आज जालना, बीड, अहमदनगर, सातारा, नाशिकसारख्या जिल्ह्यांतून शेतकरी दिवसाही शेती करू लागले आहेत, हे सौरऊर्जेचे खरे यश. ऊर्जेच्या या लोकशाहीकरणातूनच ग्रामीण भारत आज खऱ्या अर्थाने सक्षम होत आहे, असे म्हटल्यास ते फारसे चुकीचे ठरणार नाही. फक्त शेतीपुरतेच नाही, तर शहरांमध्येही छतावरील सौरऊर्जा हा गेमचेंजर ठरत आहे. आज सामान्य माणूस ७८ हजारांपर्यंतचे अनुदान घेऊन त्याच्या घराच्या छतावर सौर पॅनेल बसवत आहे. यामुळे त्याचे वीजबिल कमी झाले आहेच, त्याशिवाय त्याला दरमहा एक निश्चित उत्पन्न मिळण्याची सोय त्यातून होत आहे. ही योजना म्हणजे लोकांना ऊर्जा उत्पादक बनवण्याची संधी आहे. ही योजना म्हणजे केवळ आर्थिक बचत नाही, तर ऊर्जा विषयक स्वयंपूर्ण होण्याचा प्रवास आहे. काँग्रेसच्या काळात जेथे देशभरातील जनता सरकारी विजेच्या कृपेवर अवलंबून होती, त्याच देशात आता सर्वसामान्य स्वतःची वीज स्वतः तयार करत आहेत. सौरऊर्जेचा अजून एक लक्षणीय फायदा म्हणजे पारंपरिक ऊर्जास्त्रोतांवरील ताण त्यामुळे कमी होतो. दिवसा सौर प्रकल्प वीज निर्माण करतात. त्याचा वापर करून पारंपरिक वीज यंत्रणांवरचा भार कमी होतो. उर्वरित वीज अन्य महत्त्वाच्या क्षेत्रांकडे वळविता येते. यात उद्योग, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा योजना यांचा समावेश होतो. ऊर्जेचे हे शास्त्रीय व्यवस्थापन म्हणजे शाश्वततेच्या दिशेने टाकलेले एक मजबूत पाऊल होय. आज कार्बन उत्सर्जन हा जागतिक संकटाचा विषय असून, सौरऊर्जा यामध्ये 'ग्रीन अल्टरनेटिव्ह ठरत आहे. महाराष्ट्राने सौरऊर्जेच्या माध्यमातून दरवर्षी लाखो टन कार्बन डायक्साईडचे उत्सर्जन टाळले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून हे एक आदर्श मॉडेल ठरू शकते. ऊर्जेच्या बाबतीत महाराष्ट्र केव्हाच स्वयंपूर्ण बनला असून, आता तो वीज इतरांना देण्याच्या स्थितीत आला आहे. काँग्रेसी काळात आपण विजेसाठी शेजारील राज्यांवर अवलंबून होतो. इतर राज्ये त्यांच्याकडील अतिरिक्त वीज महाराष्ट्राला देत असत. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. एवढी क्षमता महाराष्ट्राने निर्माण केली आहे. यामध्ये सरकारचे स्पष्ट धोरण, निधीची उपलब्धता, योजनांची काटेकोर अंमलबजावणी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, यातील जनतेचा सहभाग हे सौरक्रांतीच्या यशाचे सूत्र ठरले आहे. महाराष्ट्र आता अंधारमय कालखंडातून तेजोमय भविष्याच्या दिशेने प्रवास करत आहे. ही वाटचाल केवळ ऊर्जेची नसून, ती आत्मनिर्भरतेची, शाश्वततेची आणि राष्ट्रनिर्माणाची आहे.

# मोबाईलपेक्षा मुलं महत्त्वाची





**किशोर जाधव**
मो. ९९२२८८२५४१
सोलापूर

मैदानावरून धावत होतो. योग कठ्ठ्यावर पती–पत्नी आणि त्यांचे छोटेसे मूल, साधारणतः दोन ते तीन वर्षांचे, दोघांच्या मध्ये लुडबुडत होते. मुलाच्या आई–बाबांच्या हातात मोबाईल होते. दोघे मोबाईल पाहण्यात दंग होते. मूल दोघांच्या साद–प्रतिसादाची व्याकुळतेने वाट पाहत होते. मुलाला आईकडून प्रेम, मायेची उब हवी होती; तर वडिलांकडून शाबासकी, हिंमत आणि सुसंवाद हवा होता. पण त्या दोघांकडून काहीच मिळत नव्हते. दोघे मोबाईललाच आपला सखा–सोबती मानून त्यालाच साथ देत होते. बिचारा मुलगा अश्रूंनी डोळे भरून रडू लागला, तरी जन्मदात्या आई–बाबांना त्याच्यासाठी मायेचा पाझर फुटत नव्हता. ते एकमेकांकडे पाहत पुन्हा मोबाईलमध्ये गुंग झाले. शेवटी मुलाने मोठ्याने टाहो फोडला. आईने मोबाईल एका हातात आणि मूल दुसऱ्या हातात धरून आपल्या मायेची मोबाईल आणि मुलामध्ये समान वाटणी केली. आज माणसाचं पानही मोबाईलशिवाय हालत नाही. अशा काळात मुलांचे संगोपन करण्यात मोबाईल मोठा अडथळा ठरत आहे. मुलांशी सुसंवाद घडला नाही, तर वय वर्षे १ ते १४ पर्यंतच्या मुलांच्या तीव्र जिज्ञासांना पंख लावता येणार नाहीत. त्यांची सर्जनशीलता, नवनिर्मितीची आणि ज्ञान– माहिती मिळवण्याची ओढ कमी होईल. मुलांशी सुसंवाद घडला तरच त्यांना संस्कार देता येतील. मोबाईलवर प्रेम करणाऱ्या आई–बाबांकडे पाहून मुलांमध्ये नक्कीच न्यूनगंडाची भावना निर्माण होत असेल.

मुलं ही पालकांचे अनुकरण करतात या सूत्रानुसार पुढे ही मुलंही पालकांसारखी मोबाईलला चिकटतात.त्यांचा स्क्रीन टाइम वाढतो. ही मुलं शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या अप्रगत राहू शकतात . मोबाईल की मुलं...? हा प्रश्न पालकांनी आता धाडसाने सोडवला पाहिजे. मोबाईल वापरण्याची स्वतःची आचारसंहिता तयार केली पाहिजे. मुलांना मोबाईलचा पर्याय न देता कृतीला वाव देणारी खेळणी द्यायला हवीत. मुलांशी सतत संवाद साधायला हवा, त्यांच्या भावना समजून घ्यायला हव्यात. वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत मुलांचा पाच हजार शब्दांचा शब्दसंग्रह होणं अत्यावश्यक असतं. त्यामुळे श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या भाषा शिक्षणाच्या पाया मजबूत होतो. मोबाईलमुळे कमी ऐकवलं गेलं तर पुढील सर्व टप्पे ढासळू शकतात.

आजकालची लहान मुलं देखील मोबाईलच्या आहारी गेली आहेत. मोबाईल पाहत पाहत जेवण्याची सवय त्यांना त्यांच्या आईकडून लागते. यातून मुलांना काय खातात आणि किती खातात हे समजत नाही. अन्नाबद्दल गोडी निर्माण होत नाही. मन लावून अन्न खाल्ल्यासच पोषक तत्त्वे मिळतात आणि बुद्धी तल्लख व शरीर सुदृढ होते. मोबाईलमुळे संवाद हरवला आहे. याची जाणीव सर्वांना होत आहे. पूर्वी आजी–आजोबा आपल्या नातवंडांशी संवाद साधायचे. गप्पा, गोष्टी घडायच्या. आज विभक्त कुटुंबपद्धतीमुळे ही पोकळी मोठी आहे. ती सुद्धा भरून काढण्याचे काम आई बाबांना करायचे आहे.

मुलांचं संगोपन घोड्यावर स्वार होण्यासारखं आहे कधी गतीला अनुसरावं लागतं, कधी लगाम घट्ट करावा लागतो. मुलांशी संवाद साधण्याचं तंत्र पालकांनी शिकलं पाहिजे. मोबाईलमध्ये सतत तोंड खुपसून हे शक्य होणार नाही.

पालकत्व हे कोणत्याही शाळेत शिकवलं जात नाही. ते स्वतःच्या अनुभवातून आत्मसात करावं लागतं. मुलांमधील गुण ओळखून त्यांना संधी उपलब्ध करून देणं आवश्यक आहे. खोटं न बोलणं, मदत करणं, सार्वजनिक जीवनात सहभागी होणं, हे मुलांना शिकवायचं असेल तर मोबाईल बाजूला ठेवावा लागेल. मुलांमध्ये समाजावर विश्वास वाढवणाऱ्या गोष्टींवर भर द्यायला हवा.

शेवटी, मुलांसाठी मोबाईल स्विच ऑफ करून गुणवत्तापूर्ण वेळ द्यायलाच हवा!

# प्रशासनात नव्याने येणाऱ्या अधिकाऱ्यांकडून जनतेच्या अपेक्षा



**लक्ष्मण जगताप**
बारामती.

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात युपीएससी या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. सामान्य कुटुंबातील अगदी खेड्यापाड्यात राहणा–या अनेकांनी या परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवून अपार मेहनतीचे चीज केले याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन.

आएएस ,आपीएस ही भारतीय प्रशासकीय सेवेतील अतिशय मानाची आणि प्रतिष्ठेची पदे मानली जातात. तेथे जाण्यासाठी लाखो युवक जीवाचे रान करतात.आपल्या आयुष्यातील महत्वाची आठ दहा वर्षे घालवितात.बरं सगळ्यांच्याच हाताला यश लागत नाही काहींना अपयशाचाही सामना करावा लागतो.कुटुंबाला, समाजाला तसेच मित्रमंडळींना तोंड द्यावे लागते. सगळेच काही समजून घेणारे नसतात. तुमच्यावर टीका करुन नाउमेद करणारेही असतात. अशा लोकांकडे दुर्लक्ष करुन पुन्हा प्रयत्न करावे लागतात.यश मिळाल्यावर मात्र लांब गेलेले,टीक केलेले पुन्हा हार तुरे घेऊन सत्काराला येतात.ही समाजाची रीतच आहे. तुम्ही यशस्वी होता त्यावेळी सगळेच तुमच्या जवळचे होतात.तुमचे नाणे खणखणीत वाजल्याशिवाय हा समाज तुम्हाला स्वीकारत नाही. विद्यार्थ्यांची बुद्धीमत्ता,जिद्द, चिकाटी, मेहनत, संयम या गुणांची परीक्षा बघणारी युपीएससी ही जगातील कठीण अशी एक परीक्षा आहे. म्हणून तिचे महत्वही तेवढेच आहे.तिचा सक्सेस रेशो टक्का एक किंवा कमीही असतो.

आज सोशल मिडियातून यशस्वी झालेल्या यशवंत विद्यार्थ्यांवर होणारा अभिनंदनाचा वर्षाव पाहून मन सुखावते.त्यांचा कामगिरीचा आणि घेतलेल्या कष्टाचा आनंद वाटतो.

सामान्य कुटुंबातील पोरं कष्ट आणि मेहनतीच्या जोरावर प्रशासकीय सेवेत जनकल्याणासाठी जात आहेत.आपण अनेकदा त्यांच्या मुलाखतीमध्ये ऐकतो वाचतो प्रशासकीय सेवेत जाऊन प्रामाणिक पणे जनतेची सेवा करायची आहे. प्रशिक्षण पूर्ण होऊन प्रत्यक्ष अधिकारी म्हणून सेवेला सुरुवात होते त्यावेळी याचा विसर पडता कामा नये. सामान्य कुटुंबातून आलेल्या अधिका–यांनी सामान्य जनतेला न्याय द्यावा.

आपल्या हाती असणा–या अधिकाराचा वापर करुन विनासायास जनतेची काम करावीत. जनतेचे सेवक म्हणून आपले कर्तव्य व जबाबदा–या पार पाडताना दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. मुलाखतीमधील आपले बोलणे आणि प्रत्यक्ष कृती यामध्ये विसंगती दिसता कामा नये. नाहीतर उक्ती आणि कृती यात फरक पडेल .अर्थात याला काही अधिकारी अपवाद आहेत. निस्पृहपणे जनतेची कामे करतात. त्यांना जनता डोक्यावर घेते.

आज सामान्य माणसाला प्रशासनाबद्दल तितकासा चांगला अनुभव येत नाही. कारण सामान्य माणसाला छोट्या छोट्या कामासाठी नाडले जाते. त्रास दिला जातो. शेवटी वैतागून तो हतबल होऊन थांबतो. त्याचा प्रशासनावरचा विश्वासच उडतो.

खरं तर लोकशाही व्यवस्थेत जनता हीच देशाची मालक असते.संविधानाने सामान्य नागरिकाला अनेक अधिकारी बहाल केले आहेत.परंतु आज सामान्य माणसाचा आवाज दाबला जातो.

जनतेच्या कररुपी गोळा होणाऱ्या पैशातून चांगले वेतन आणि भत्ते मिळत असताना चिरीमिरी घेण्याची गरज का पडते.याचाही विचार झाला पाहिजे. सामान्य जनतेची कामे सुलभ आणि विनातक्रार विनासायास झाली पाहिजेत.

प्रशासनात नव्याने अधिकारी म्हणून येणाऱ्या तरुणांकडून नाडल्या जाणा–या सामान्य जनतेच्या खूप अपेक्षा आहेत. प्रशासनातील पदे ही स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे तर जनतेच्या कल्याणासाठी असतात याचा कदापी विसर पडता कामा नये.तुमच्या एका सहीने एखाद्याच्या आयुष्याचे भले झाले तर ते तुमच्या आयुष्याचे संचित असेल.

अधिकारी म्हणून असे काम करा की ज्या भागात जाताल तेथे आपल्या कामाचा ठसा उमटवा.गोरगरीब जनतेची कामे विनासायास करा.लोकांच्या अडीअडचणी सोडवा.त्यांना प्रशासन म्हणून विश्वास द्या. जनता तुमच्यावर भरभरुन प्रेम करेल. तुम्ही मनात जे स्वप्न घेऊन प्रशासनात पाऊल ठेवले होते ते पूर्ण झाल्याचे समाधान लाभेल.कामाचा आनंद मिळेल. एक प्रामाणिक आणि जनतेबद्दल कळवाळू असणारा अधिकारी म्हणून जनतेच्या मनावर कायमचे अधिराज्य गाजवाल... बस्स एवढेच.

# मुरुम शहर एकवटले; शहिदांना श्रद्धांजली आणि दहशतवादाचा बिमोड करण्याचा केला निर्धार




## छत्रपती शिवाजी महाराज चौकात पहलगाम हल्ल्याचा निषेध

**आरंभ मराठी । मुरूम**

जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या सन्मानार्थ आणि या हल्ल्याच्या तीव्र निषेधार्थ मुरुम शहरात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकांसह सर्व जाती–धर्मातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या श्रद्धांजली सभेच्या वेळी उपस्थित नागरिकांनी दिवंगत बांधवांच्या स्मृतीप्रित्यर्थ मेणबत्त्या प्रज्वलित केल्या आणि दोन मिनिटांचे मौन पाळून त्यांना आदरांजली अर्पण केली. विविध मान्यवरांनी आपल्या मनोगतातून देशातील शांतता, ऐक्य आणि बंधुभावाचे महत्व अधोरेखित केले. दहशतवादाविरुद्ध कडक भूमिका घेण्याची आणि देशाच्या सुरक्षेसाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरजही व्यक्त केली. या वेळी संपूर्ण परिसर देशभक्तीपर घोषणांनी निनादला होता. वातावरणात एक वेगळीच ऊर्जा आणि देशप्रेमाची भावना अनुभवास मिळाली. कार्यक्रमाचे आयोजन समस्त मुरुम शहरवासीयांच्या वतीने करण्यात आले होते. या श्रद्धांजली सभेचे संयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडले.

# मेंढा येथे पंचायत राज दिनानिमित्त ग्रामसभेचे आयोजन




**आरंभ मराठी । तेर**

राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय मेंढा येथे राष्ट्रीय पंचायत राज दिन साजरा करण्यात आला. यावेळी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या पत्रानुसार व वरिष्ठ कार्यालयाच्या पत्रानुसार २४ एप्रील रोजी या विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच नामदेव दगडू वाघमारे हे होते. गावातील मान्यवर ग्रामपंचायत सचिव तथा ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी नरसिंगराव बोचरे, उपसरपंच राजूबाई विठ्ठल घुले व इतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामसभेत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सेवा हक्क हमी कायदा उद्दिष्टाचे वाचन करण्यात आले. तसेच सन २०२४ – २५ मध्ये ज्या नागरिकांनी शंभर टक्के करभरणा केला अशा लोकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच इतर काही विषयावर ग्रामस्थाबरोबर सकारात्मक चर्चा करण्यात आली व राष्ट्रीय पंचायतराज दिवसाच्या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# उद्या साजरा होणार ''गोमय उत्पादने विक्री दिवस''

**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या पुढाकाराने आणि अक्षय तृतीयेनिमित्त उद्या (दि.३०) धाराशिव जिल्ह्यात ''गोमय उत्पादने विक्री दिवस'' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे गायीच्या शेण व गोमुत्रापासून तयार केलेल्या आरोग्यवर्धक आणि पर्यावरणस्नेही उत्पादनांचा प्रचार व प्रसार करणे.जिल्ह्यातील महाराष्ट्र गोसेवा आयोग नोंदणीकृत १७ गोशाळांमधून तयार करण्यात आलेली आयुर्वेदिक औषधे,सौंदर्य प्रसाधने,धूप,अगरबत्ती,कीटकनाशके आदी विविध उत्पादने नागरिकांसाठी विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.



या उपक्रमामुळे गोशाळांना बाजारपेठ मिळवून देऊन त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.या दिवशी जिल्ह्यातील जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय बसस्थानकांवर तात्पुरते स्टॉल्स उभारण्यात येणार असून, यासाठी पशुसंवर्धन सहआयुक्त तथा गोसेवा आयोगाच्या सदस्य सचिव डॉ.मंजुषा पुंडलीक यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांना याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हा पशुसंवर्धन प्रशासन आणि गोशाळा संचालक यांच्या सहकार्याने हे स्टॉल्स उभारले जातील.जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त धाराशिव यांनी केले आहे.

# शिराढोणच्या शरदचंद्र महाविद्यालयात दिक्षांत समारंभ उत्साहात




**आरंभ मराठी । धाराशिव**

कळंब तालूक्यातील शिराढोण येथील शरदचंद्र महाविद्यालयात सोमवारी (दि.२८) दिक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या संमारंभात सन २०१७ पासून पदवी उत्तीर्ण होवून गेलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी हिंदूस्थानी एज्यूकेशन सोसायटीचे सचिव प्रा.डॉ.अफसर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याण नेहरकर, मोहेकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. के.डी.जाधव, सरंपच लक्ष्मीताई म्हेत्रे, उपसरपंच अमोल माकोडे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साजेद चाहूस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. शाकीलोद्दीन काझी, प्रा. डॉ. फारुख तांबोळी, प्रा. डॉ. कमलाकर घोलप, प्रा.डॉ. महेबूबपाशा शिरमाळे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले. कार्यक्रमासाठी पत्रकार रणजित गवळी, राहूल ओमणे, ताजखॉ पठाण यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. एस व्ही खोंड यांनी मानले.

# धाराशिव तहसील कार्यालयात ई–लायब्ररी आणि वेबसाईटचा शुभारंभ

## नागरिकांसाठी महसूल सेवा अधिक सुलभ होणार




**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तहसील कार्यालयाच्या QR कोड ई–लायब्ररी आणि अधिकृत वेबसाईटचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव यांच्या हस्ते शनिवारी (दि.२६) करण्यात आले. यावेळी तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, नायब तहसीलदार, तलाठी, महसूल कर्मचारी तसेच कोतवाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसील कार्यालयाचा कारभार अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि नागरिकांच्या उपयोगासाठी सुलभ व्हावा या उद्देशाने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. गावागावात दाखले मिळवण्यासाठी येणाऱ्या शेतकरी व ग्रामस्थांना, तसेच महसूल कर्मचारी व वकील बांधवांना महसूल विषयक कायदे,बनियम व परिपत्रके सहज उपलब्ध होण्यासाठी ही ई–लायब्ररी आणि वेबसाईट उपयुक्त ठरणार आहे. या माध्यमातून महसूलविषयक कामे अधिक गतिमानपणे पार पाडली जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. ई–गव्हर्नन्सच्या दिशेने मुख्यमंत्री शंभर दिवस कृती कार्यक्रमांतर्गत राबवलेल्या या उपक्रमामुळे तहसील कार्यालय आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी होईल आणि विविध शासकीय उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत लवकर पोहोचू शकेल. धाराशिव तालुक्यातील नागरिकांनी या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी केले. पुढील टप्प्यात गाव पातळीवरही तलाठी कार्यालयात अशीच व्यवस्था सुरू करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# खाजगी सौरउर्जा कंपनीच्या तारेचा शॉक बसून तरुण कामगाराचा जागीच मृत्यू

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील माळुंब्रा येथील अठ्ठावीस वर्षीय युवक खाजगी सौर उर्जा विद्युत वहन पोलवर कामासाठी चढला असता, विजेचा शॉंक लागुन जागीच मरण पावल्याची घटना शनिवारी (दि.२६) सकाळी घडली. सदरील युवक हा एकुलता एक होता. त्याला दीड वर्षाची मुलगी आहे. त्याच्या निधनाने कुंटुंब उघड्यावर पडले असून, या प्रकरणी खाजगी सौर उर्जा कंपनीने मयतास मदत करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली. परंतु, खाजगी सौर उर्जा कंपनीने दोन दिवसानंतरही ही प्रतिसाद न दिल्याने माळुंब्रा ग्रामवासियांनी तुळजापूर सोलापूर महामार्गावर अखेर रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी महामार्गाचा दोन्ही बाजूला वाहनांच्या एक किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. यावेळी शिवसेना नेते अमोल जाधव, सरपंच गजानन वडणे यांच्यासह गावकरी उपस्थित होते. या आंदोलनात महिला मोठ्या संखेने सहभागी झाल्या होत्या. या आंदोलनामुळे तुळजापूर सोलापूर महामार्ग रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. या रस्ता रोको आंदोलनास्थळी तहसिलदार अरविंद बोळंगे, पोलिस निरक्षक अण्णासाहेब मांजरे, भाजप मंडल अध्यक्ष आनंद कंदले यांनी भेट देवुन आंदोलकांशी चर्चा केली. या वेळी तामलवाडी पो स्टे चे पोलिस निरक्षक गोकुळ ठाकुर यांच्यासह त्यांचे सहकारी बंदोबस्तासाठी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

## विविध वृत्त...

### परशुराम जन्मोत्सवानिमित्त ब्राह्मण समाजाच्या वतीने आज भूम शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**आरंभ मराठी । भूम**

श्री परशुराम जयंती निमित्त भूम शहर व तालुक्यातील सकल ब्राम्हण समाज यांच्या वतीने आज (दि.२९) विविध धार्मिक कायक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास



समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. सकाळी कसबा येथील श्रीराम मंदिरापासून मिरवणूक निघणार असून, कसबा मेन रोड, गांधी चौक, नगर पालिका चौक, ओंकार चौक, फ्लोरा चौक मार्गे समर्थ नगर येथील श्री दत्त ध्यान योग मंदीर येथे विसर्जित होईल. यावेळी ब्राम्हण समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या महिला व पुरुषांचा यावेळी सत्कार होईल. त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजता कसबा येथील श्रीराम मंदीरात श्री परशुराम जयंती सोहळा पुष्पवृष्टी करुन महाआरती होवुन प्रसाद वाटप करुन होणार आहे. यासाठी सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष विलास शाळु, तालुका अध्यक्ष सुधीर देशमुख, शहर अध्यक्ष संजय शाळु यांनी केले आहे.

### उमरगा येथे पाच नवीन एसटी बसचे उद्घाटन



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा आगाराला पाच नवीन एसटी बसेस मिळाल्याने या बसेसचे उद्घाटन आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते शनिवारी (दि.२६) करण्यात आले. यावेळी शिवसेना उबाटा गटाचे युवा नेते डॉ. अजिंक्य बापू पाटील, शिवसेनेचे शिंदे गटाचे मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. पहिल्याच अधिवेशनात उमरगा आगारास ५० नवीन एसटी बसेस मिळाव्यात अशी मागणी आमदार प्रवीण स्वामी यांनी केली होती. धाराशिव येथील बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनाही या एसटी बसेस देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार दहा एसटी बसेस मंजूर झाल्या असून त्यातील पाच एसटी बसेस उमरगा आगारात दाखल झाल्याने या एसटी बसेसचे उद्घाटन आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. यावेळी जिल्हा शिवसेना शेतकरी संघटक विजयकुमार नागने, माजी नगराध्यक्ष रज्जाक अत्तार, महावीर कोराळे, अशोक सांगवे, राजेंद्र समाने, आप्पाराव गायकवाड, प्रा डी के माने, बाबा मस्के, एडवोकेट इनामदार हे पदाधिकारी उपस्थित होते.

### श्री तुळजाभवानी सैनिकी स्कूलचे स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षा २०२४-२५ मध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे. या परीक्षेसाठी एकूण २९ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी ११ विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत. त्यामध्ये गवळी गौरव (२३४), पाटील अर्जुन (१९८), जमदाडे धीरज (१८२), नवगिरे सोहम (१५२ ), कुंभार कार्तिक (१५०), हुंडेकरी समाधान (१४४), पाटील त्रंबक(१४४), कापसे सोहम (१४२), केदार संस्कार (१४० ), जाधव श्रेयस (१३६), चव्हाण सार्थक (१३२) या सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य वैजनाथ घोडके, पर्यवेक्षक डॉ. पेटकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना श्रीमती पाटील, श्रीमती घुगे, श्रीमती साळुंके, श्रीमती भिसे, स्वामी, पडनुर, गोळे, सावंत, सलगर इत्यादींनी मार्गदर्शन केले.

### नारंगवाडीची वाडी येथे संत गोरोबा काकांच्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसादाचे वाटप

**आरंभ मराठी । नारंगवाडी**

वारकरी संप्रदाया वैराग्य महामेरू म्हणून ओळखले जाणारे संतकवी म्हणजे, संत गोरा कुंभार. संतमंडळात गोरोबाकाका म्हणून प्रिय असणाऱ्या या थोर संताच्या पुण्यतिथीनिमित्त नारंगवाडीची वाडी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी येथे ७६ वर्षांपासून परंपरेनुसार गोरोबा सुरवसे यांच्याकडून दरवर्षी संध्याकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. तसेच रात्रभर भजन करण्यात येते. यामध्ये रविवारी काल्याचे कीर्तन आणि काला पार पडला. रविवारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या महाप्रसादाचा परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी लाभ घेतला. यावर्षी गोरोबा सुरवसे यांच्याकडून श्रद्धा असावी अंधश्रद्धा नसावी तसेच नामस्मरण करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी लक्ष्मण सुरवसे, अर्जुन सुरवसे, प्रेमनाथ सुरवसे, भजनी मंडळ, महिला मंडळ सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# सोनारी येथे काळभैरवनाथाच्या यात्रेनिमित्त रंगली कुस्त्यांची दंगल



**आरंभ मराठी । परंडा**

**परंडा तालुक्यातील श्री क्षेत्र सोनारी येथील श्री काळभैरवनाथांच्या यात्रेनिमित्त झालेल्या कुस्ती आखाड्यात अंतीम ५१ हजार रुपये इनामाची कुस्ती विजय मांडवे व अनिल जाधव (करमाळा) यांच्यात होवुन तुल्यबळ अटीतटीच्या घमासानानंतर बरोबरीत सोडविण्यात आली. तर क्रमांक दोन कुस्तीत बाळु भैरवाल (कडआष्टी) याने प्रमोद सुळ (कुर्डुवाडी) यास पोकळ घिस्सा डावावर चितपट करुन ३१ हजार इनामाचे बक्षिस पटकाविले. या कुस्ती मैदानात रोख इनामाच्या लहान मोठ्या १५० कुस्त्या घेण्यात आल्या. या कुस्ती आखाड्यासाठी राज्यातील नामांकीत मल्लानी हजेरी लावली होती.**

## ■ अटीतटीची कुस्ती सुटली बरोबरीत
## ■ आखाड्यात दीडशे कुस्त्यांचे डाव रंगले

सोनारी येथील श्री काळभैरवनाथांचा यात्राउत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.''लाल मातीवरच्या कुस्तीत आहे खरी मस्ती '' याचा प्रत्यय यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही कुस्ती आखाड्याचे पुजन करुन मान्यवरांच्या हस्ते कुस्ती स्पर्धेला सुरुवात झाली. सोनारी हे गाव कुस्ती खेळासाठी राज्यात सर्वपरिचित आहे. या ठिकाणी कुस्ती खेळण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक नामांकित मल्ल हजेरी लावतात. सोनारीचे भुमीपुत्र उपमहाराष्ट्र केसरी स्वर्गीय नारायण हंगे यांनी कुस्ती क्षेत्रात राज्यासह, परराज्यातही मोठा नावलौकिक मिळविल्याचा इतिहास आहे.



राज्यातील विविध भागामधुन नामांकित मल्ल आजी-माजी वस्तादमंडळी आवर्जुन कुस्तीआखाड्यासाठी हजेरी लावतात. स्पर्धेसाठी सुसज्ज लाल मातीचा आखाडा तयार केला होता. या कुस्ती मैदानात २०० रुपयापासुन एक्कावन्न हजारापर्यंत इनाम बक्षिसे देण्यात आली. दुरगावाहुन आलेल्या मल्लांनी कुस्ती खेळातील डाव-प्रतिडावांचे मल्लयुध्द खेळुन मैदानात मोठी रंगत आणली. हलगीच्या कडकडाटात मल्लांनी चटकदार व चितपटीने केलेल्या कुस्त्यांमुळे आखाड्यात पैलवानांच्या खडाखडीने स्पर्धा रंगतदार झाल्या. मल्ल मनोज पवार याने ढाक डावावर धीरज बारसकर यास चीतपट करुन प्रेक्षणीय विजय मिळविला. बुरुजबंद मल्ल मेघराज जगताप विरुध्द रविंद्र खैरे यांची कुस्ती तुल्यबळ लढतीनंतर पंचानी बरोबरीत सोडली.

या मैदानात कुस्तीचे डावपेच ढाक मारणे, एकेरी पट काढणे, साल्तु(बक थ्रो) झोळी बांधणे, भारंदाज, कलाजांग, एकलांगी, घुटना, घिस्सा, छडी टांग, दसरंग फिरणे, कुंदा करणे आदि डावांनी मैदानात मोठा रंग भरला होता. विजयी मल्लांना प्रेक्षकांनी रोख बक्षिसे दिली.

मल्ल गौरव गुटाळ, गणेश काळे, अजय चोरगे, ऋषी मेंडके, संतोष नरुटे, किरण पाडुळे, समीर पठाण, किरण काळदाते, शिवराज लोकरे, पवन करकुटे, मेघराज देवकरहर्षद लोमटे, करण फले, गणेश कारंडे, रोहीत काळे, अंकुर नलवडे, शहाजी फले, यांनी प्रतिस्पर्ध्यास चितपट करुन प्रेक्षणीय विजय मिळवले.

## धाराशिव नगर वाचनालयाच्या अध्यक्षपदी नितीन तावडे व सचिवपदी श्रीकांत साखरे

**आरंभ मराठी । धाराशिव**

नगर वाचनालय धाराशिव च्या अध्यक्षपदी नितीन तावडे व सचिव पदी श्रीकांत साखरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

ज्येष्ठ सदस्य अंबादास दानवे यांच्या अध्यक्षतेखाली नगर वाचनालय कार्यकारिणीची बैठक दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वाचनालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीत नगर वाचनालयाच्या अध्यक्षपदी नितीन तावडे व सचिव पदी श्रीकांत साखरे यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे निवडण्यात आले. सहसचिव अंबादास दानवे, उपाध्यक्ष प्रा. डॉ.सतीश कदम, कोषाध्यक्ष शरद मुंडे, समन्वयक प्रदीप साळुंके, बांधकाम विभाग आशिष



मोदाणी, प्रसिद्धी विभाग बालाजी तांबे, वाचन विभाग सुभाष पाटोळे, ग्रंथ खरेदी विभाग ॲड. रमेश सूर्यवंशी, साहित्य व सांस्कृतिक विभाग सौ. प्रज्ञा सुरेश शेळके यांची निवड करण्यात आली. धाराशिव येथील नगर वाचनालय हे मराठवाड्यातील अव्वल दर्जाचे आहे. १००० पेक्षा अधिक आजीव सभासद असून सुमारे १४८० वाचक सभासद आहेत. वाचनालयात ९० हजार पेक्षा अधिक ग्रंथ संपदा आहे. वाचन चळवळ वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मनोदय नूतन अध्यक्ष नितीन तावडे यांनी व्यक्त केले. सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रवीण बागल यांचा सत्कार

**आरंभ मराठी । धाराशिव**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा क्रीडा प्रकारातील सर्वोच्च शिवछत्रपती मार्गदर्शक पुरस्कार २०२५ हा धाराशिव शहरातील भोसले हायस्कूल येथे कार्यरत असलेले क्रीडा शिक्षक प्रवीण बागल यांना जाहीर व प्रदान झाला आहे. या पुरस्काराचे वितरण बालेवाडी क्रीडा संकुल पुणे येथे महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मराठवाड्यातील हा तिसरा पुरस्कार असून धाराशिव जिल्ह्यातून दुसरा पुरस्कार प्रवीण बागल यांना प्राप्त



झालेला आहे. खो-खो या खेळात अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडू घडविण्यामध्ये प्रवीण बागल यांचा सिंहाचा वाटा आहे. अत्यंत कष्टाने बुद्धिमत्तेने हे यश बागल सर यांनी प्राप्त केलेले आहे. ही गोष्ट तमाम धाराशिवकरांसाठी अभिमानास्पद आहे. प्रवीण बागल यांच्यामुळे धाराशिवच्या क्रीडा क्षेत्रात एक यशाचा परमोच्च तुरा रोवला गेला आहे. या अतिउच्च कामगिरीबद्दल त्यांचा शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवचे उपाध्यक्ष अमोल सिरसट, शहर कार्याध्यक्ष बालाजी खोचरे, व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष नितीन फंड, शुभम लोकरे, अविनाश रणखांब, दत्तात्रय जावळे, सचिन गायकवाड, योगेश अतकरे, ऋषिकेश काळे, व्यंकटेश पडिले, प्रतापसिंह काकडे, लिंबराज कुंभार इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## वंध्यत्वावरील आधुनिक उपचार पद्धती विषयक सीएमई कार्यशाळेला प्रतिसाद

**८० पेक्षा अधिक प्रतिनिधींनी घेतला उत्स्फूर्त सहभाग**

**आरंभ मराठी । धाराशिव**

उस्मानाबाद स्त्रीरोग आणि प्रसूतीतज्ञ संघटना, महाराष्ट्र चॅप्टर ऑफ ईसार (MSR) आणि महाराष्ट्र स्त्रीरोग आणि प्रसूतीतज्ञ संघटना (AMOGS) यांच्या संयुक्त विद्यमाने वंध्यत्वावरील आधुनिक उपचार पद्धती, यावर सिएमई कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेला चांगला प्रतिसाद मिळाला.

मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन आणि दिप प्रज्वलन करून या कार्यक्रमाचे उदघाट्न करण्यात आले.

यावेळी धाराशिव फॉग्सी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि आयव्हीएफ तज्ञ डॉ. आदिनाथ राजगुरू यांनी प्रस्ताविक केले. ते म्हणाले, समाजातील वंध्यत्वाच्या वाढलेल्या प्रमाणमागचे कारण म्हणजे विवाहाचे वाढलेले वय, बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा, व्यसनाधीनता, आहारातील बदल ही असून, त्यावर वंध्यत्वाच्या व्यवस्थापनातील आधुनिक आणि नवनवीन उपचारपद्धती या प्रगतीवर चर्चा करण्यासाठी हे सीएमई कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले.

''इन्फर्टिलिटी अपडेट'' या विषयावर अतिशय यशस्वी सीएमई पार पडली. या कार्यशाळेसाठी धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यांमधून ८० पेक्षा जास्त



प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी पुणे येथील डॉ. आशीष काळे यांनी ''ओव्ह्युलेशन इंडक्शन टिप्स व ट्रिक्स, लातूरचे डॉ. कल्याण बरमदे यांचे फर्टिलिटी वाढविणाऱ्या एंडोस्कोपिक शस्त्रक्रिया, मुंबई येथील डॉ. केदार गानला यांचे पुरुष वंध्यत्व आणि आधुनिक उपचार, डॉ. आदिनाथ राजगुरु यांचे कमी झालेली बीजधारणेची क्षमता आणि ती वाढवण्याच्या आधुनिक उपचारपद्धती व व्यवस्थापन, पुणे येथील डॉ. कुंदन इंगळे यांचे पीसीओडी यामुळे आलेले वंद्यत्व, आधुनिक उपचार आणि त्याच्या व्यवस्थापनातील सुधारणा या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच आययूआय पुराव्यासह उपचारपद्धती व केंव्हा आयव्हीएफ करावे या विषयावर एक अत्यंत माहितीपूर्ण पॅनेल डिस्कशन झाले. ज्याचे संचालन डॉ. कुंदन इंगळे व डॉ.केदार गानला यांनी केले आणि ज्यात तज्ञ डॉ. विजय पवार, डॉ. आशीष काळे, डॉ. मोनिका उंबरदंड व डॉ. स्मिता यादव सहभागी झाले होते. याशिवाय, डॉ.आशीष काळे व डॉ. आदिनाथ राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली सिमेन प्रिपरेशन व आययूआय टेक्निक्स या विषयावर एक अत्यंत उपयुक्त व संवादात्मक कार्यशाळा देखील झाली.

स्त्री रोगतज्ञ व वंध्यत्व तज्ज्ञांमध्ये अनुभवांची देवाण-घेवाण साधण्यासाठी, ज्ञानवृद्धी व कौश्याल्यवृद्धी करण्यासाठी ही सीएमई एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरली. यावेळी जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ.मीना जिंतूरकर, वूमेन्स शाखेच्या जिल्हाध्यक्ष डॉ कौशाली राजगुरू, महिला रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. स्मिता गवळी डॉ.कार्तिक यादव, डॉ. राहुल वाघमारे, डॉ. अशोक काठारे यासह, येथील फॉग्सीचे सर्व सदस्य आणि इतर मान्यवर उपस्थित होते. ही सिएमई कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी फॉग्सी संघटनेचे सचिव डॉ.इस्माईल मुल्ला यांच्यासह उपाध्यक्षा डॉ.वर्षा कस्तुरकर, खजिनदार डॉ. अश्विनी बलवंडे व आयोजन समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.निता पोळ व डॉ.शैलजा मिटकरी यांनी केले. आभार प्रदर्शन फॉग्सीचे सचिव डॉ. इस्माईल मुल्ला व डॉ.वर्षा कस्तुरकर यांनी केले.

## धाराशिव तहसील कार्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण शिबीर




**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तहसील कार्यालयात 'Stay Safe Online / Cyber Hygiene' या सायबर सुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेबाबत सखोल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव आणि तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांच्या हस्ते झाले.

MyGov Campus Ambassador आणि महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभियंता डी.बी. सलगर यांनी सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण, डेटा सुरक्षितता, ऑनलाईन फसवणूक प्रतिबंध तसेच डिजिटल व्यवहारांतील सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत वायफाय सुरक्षा, एटीएम सुरक्षा, सीम क्लोनिंग,आधार पेमेंट सुरक्षितता आणि सायबर बुलिंग संरक्षण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. याशिवाय, Artificial Intelligence (AI) च्या सहाय्याने कार्यालयीन कामकाज अधिक कार्यक्षम कसे होऊ शकते, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. या कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार एम.जी.शिंदे, नायब तहसीलदार (महसूल) विशाखा बलकवडे, नायब तहसीलदार (निवडणूक) स्वामी आणि नायब तहसीलदार (पुरवठा) अमोल बाहेकर यांची विशेष उपस्थिती होती. नायब तहसीलदार (महसूल) विशाखा बलकवडे यांनी आभार मानले. या प्रशिक्षणानंतर धाराशिव तहसील कार्यालय सायबर सिक्युरिटी अवेअरनेस आणि सायबर हायजिन प्रमाणित कार्यालय बनले असून, हा उपक्रम इतर सरकारी कार्यालयांसाठीही आदर्श ठरणार आहे.

# शाळा,महाविद्यालयांत अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन होणार

## मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**आरंभ मराठी । धाराशिव**

राज्य सरकारने अंमली पदार्थाबाबत झिरो टॉलरन्सचे धोरण अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी राज्यभरातील शाळा,महाविद्यालयात ''अँटी नार्को टिक्स क्लब'' स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये ''अँटी नार्कोटिक्स क्लब'' सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना यापूर्वीच सूचित केले आहे. जिल्ह्यातील पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही त्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. प्राप्त सामाजिक परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेऊन जिल्हा प्रशासनही याबाबत आता तत्परतेने योग्य ती पाऊले उचलत असून लवकरच याची अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा मित्र चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.



जिल्ह्यातील तरुण पिढीला या गंभीर संकटातून वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात अंमली पदार्थ विरोधी मोठी मोहीम उघडली आहे.तरुण पिढीमध्ये व्यसनांचे वाढते प्रमाण पाहता याला वेळीच पायबंद घालण्यासाठी सरकार अनेक उपाययोजना करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील महाविद्यालयामध्ये 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करणार असल्याची घोषणा केली आहे. धाराशिव जिल्ह्यात देखील आपण केवळ ड्रग्ज नव्हे तर इतर सिगारेट, मद्य यासारख्या विविध घातक व्यसनांच्या विळख्यातून तरुणाईला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत आहोत. तुळजापूर मतदारसंघातील महाविद्यालयात 'अंमली पदार्थ विरोधी क्लब' स्थापन करण्याच्या अनुषंगाने ६ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी धाराशिव, तहसीलदार तुळजापूर, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक व चार महाविद्यालयांच्या प्रचार्यांसोबत बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत पोलीस प्रशासन व पालकांनाही सोबत घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याच धर्तीवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेतली असून लवकरच त्याची अंमलबजावणी होणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# शिराढोणची पी.एम.श्री जिल्हा परिषद शाळा तालुक्यात अव्वल

■ नवोदयपाठोपाठ शिष्यवृत्ती परीक्षेतही शाळेचे घवघवीत यश

■ शिक्षकांच्या मेहनतीला विद्यार्थ्यांच्या प्रयत्नाची जोड; गावकऱ्यांनी केले कौतुक

दैनिक आरंभ मराठी SPECIAL

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

**शिराढोण : कळंब तालूक्यातील शिराढोण येथील अटल बिहारी वाजपेयी पी.एम.श्री. आदर्श जिल्हा परीषद प्रशालेची गुणवत्ता ही तालूक्यात प्रथम क्रामाकांवर झळकत आहे. एके काळी विद्यार्थी व शिक्षकांविना ओस पडलेली ही जिल्हा परीषदेची शाळा आज शिक्षकांच्या एकजूटीमुळे विद्यार्थी व पालकांनी गजबजू लागली आहे. या वर्षी नवोदय परीक्षेत ४ विद्यार्थ्यांची नवोदय प्रवेशासाठी निवड झाल्यानंतर ही यशाची मालिका सुरुच राहिली असून, या शाळेतील तब्बल २५ विद्यार्थी हे शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत. शिक्षकांच्या मेहनतीला विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची जोड मिळत असल्यामुळे गावकऱ्यांनी शिक्षक आणि विद्यार्थी दोघांचे कौतुक केले आहे.**







शिराढोणच्या पी. एम. श्री जिल्हा परिषद शाळेने तालुक्यात गुणवत्ता सिद्ध केली असून, शिक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाचे यश विद्यार्थ्यांच्या निकालातून दिसत असल्याची भावना पालक व्यक्त करत आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा चढता आलेख शाळेसह गावाचे देखील नाव मोठे करत असून, विद्यार्थ्यांना शाळेबद्दल गोडी वाटू लागली आहे. शाळेचे यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व पालकांचा शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी माजी जि.प.सदस्य शहाजी दादा पाटील, बाळासाहेब माकोडे, सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे, नितीन आबा पाटील, बेबीनंदा गोरे, विष्णुदास काळे, रणजित गवळी, राहूल ओमने, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य राजपाल देशमुख, सौ. प्रगती पाटील, सतिश शिंपले, वरुन पाटील आदींची उपस्थिती होती.

प्रशासन, राजकारण तसेच खाजगी शिक्षण संस्था यांच्या टोकाच्या अनास्थेने बळी ठरलेल्या जिल्हा परीषद शाळा या एकेकाळी ओस पडलेल्या दिसून येत होत्या. मात्र या शाळेत सध्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मिळणारा मुबलक निधी, साहित्य व जिल्हा परिषद शाळेत कार्यरत शिक्षकांनी मनावर घेवून या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे परीश्रमपूर्वक लक्ष दिले. परिणामी अनेक जिल्हा परीषद शाळांची गुणवत्ता ही सुधारल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. शिराढोण येथील अटल बिहारी वाजपेयी पी.एम. श्री आदर्श जिल्हा परिषद प्रशालेचा




गुणवत्तेचा आलेख सातत्याने चढता दिसून येत आहे. या शाळेत कार्यरत सर्वच शिक्षकांनी बेभान होवून ज्ञानार्जनाचे काम हाती घेतले आहे. परिणामी या शाळेच्या इतिहासत पहिल्यांदाच या वर्षी एनएमएमएस, मंथन, होमीभाभा, नवोदय, शिष्यवृत्ती सारख्या परीक्षेत तालूक्यात शाळा प्रथम क्रमांकावर आहे. नवोदयसाठी पहिल्यांदाच यावर्षी ४ विद्यार्थी नवोदय विद्यालयासाठी पात्र झाले. तर शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वी मधील २१ व इयत्ता ८ वीतील ४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत.

### हे विद्यार्थी झाले शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

या शाळेती इयत्ता पाचवी मधील सानवी समुद्रे, समृध्दी शिंपले, श्रवण माकोडे, प्राची खडबडे, स्नेहल सोमासे, संध्या सोमासे, समृध्दी कापसे, पंकजा जाधवर, अभिषेक कूलकर्णी, रणवीर पाटील, मेघना कस्तूरकर, सिध्दी गुरव, दृष्टी धाकातोडे, मुजफर बेग, विराट रोडे, समृध्दी दुगाने, सानवी माकोडे, संस्कृती देशमुख, कृष्णा पांचाळ, वसूंधरा यादव, स्वराली पाटील हे शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत, विशेष म्हाजे यातील १२ विद्यार्थ्यांना २०० पेक्षा जास्त गुण आहेत. इयत्ता आठवी मधील दिशा धाकतोडे, श्रावणी कस्तूरकर, रुतूजा कुलकर्णी व तेजश्री म्हेत्रे हे विद्यार्थी शिष्यवृती परीक्षेत पात्र झाल्या आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सुनिल अहिरे, रमेशकुमार काकडे, रमेश व्होके, कांतीलाल गणगे, बाळासाहेब काळे, सचिन शिंदे, संघशिल रोडे, सुनिता पोतदार व मुक्ता ढासाळकर यांनी मार्गदर्शन केले.

### या आदर्श शिक्षकांमुळे गुणवत्तेचा चढता आलेख कायम

शिराढोण येथील आदर्श जिल्हा परिषद शाळेतील गुणवत्तेसाठी मुख्याध्यापक सुनील अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक अर्जुन जाधव, रमेश व्होके, रमेशकुमार काकडे, कांतीलाल गणगे, बाळासाहेब काळे, सचिन शिंदे, दत्तात्रय राठोड, विजय कांबळे, संजय मरदोडे, शिवलाल ईनामदार, संघशिल रोडे, अशोक गोसावी, सुनिता पोतदार, मुक्ता ढासाळकर, सविता रेडेकर, शितल जाधव, मंजूषा बामणे, मिनाक्षी दहिवाडे, भाग्यश्री सुरवसे हे सर्व परीश्रम घेत आहेत.

## ढोकीचा शिवार हिरवाईने फुलणार, आ.कैलास पाटलांच्या पाठपुराव्यातून नाला खोलीकरण, रुंदीकरणाची कामे सुरू

**नाम फौंडेशन व टाटा मोटर्स यांची मदत**





आरंभ मराठी । ढोकी

आमदार कैलास पाटील यांच्या पाठपुराव्यांतून आणि नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील नाला खोलीकरण व रुंदीकरण कामाची सुरुवात करण्यात आली असून, या कामाचा शुभारंभ आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे परिसरात पाणी साठा मोठ्या प्रमाणात होऊन परिसरात हिरवागार होणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ढोकीसह परिसरातील शेतकऱ्याकडून नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्याची मागणी होत होती. यापूर्वी ढोकी येथे पाणलोट योजनेतून नाला खोलीकरण करण्यात आले. त्याचा चांगला परिणाम दिसून आला. पडलेल्या पावसाच्या पाण्याचा थेंब जमिनीत मुरण्यास याचा चांगला उपयोग झाल्याने शेतकऱ्यातून नाला खोलीकरण व रुंदी करण्याची मागणी वाढू लागली होती. धाराशिव– कळंब मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांनी शेतकऱ्याच्या मागणीची दखल घेऊन नाम फाउंडेशन यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर नाम फाउंडेशनच्या वतीने खोलीकरण करिता मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यानंतर मशीन साठी लागणाऱ्या डिझेल करिता जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने टाटा मोटर्स यांच्याकडून डिझेल उपलब्ध करून घेण्यात आले. धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील कामाचा शुभारंभ रविवारी आमदार कैलास पाटील, नाम फाउंडेशनचे समन्वयक योगेश रसाळ, उपसरपंच अमोल समुद्रे, माजी पंचायत समिती सदस्य संग्राम देशमुख, भारत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य परवेश काझी, महेश पोतदार, तुळशीदास जमाले, राजपाल देशमुख यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार कैलास पाटील यांनी या नाला खोलीकरण व रुंदीकरण कामामुळे परिसरातील भूजल पातळीत वाढ होणार असल्याचे सांगून ज्या शेतकऱ्यांनी सहकार्य केले त्यांचे कौतुक करून त्यांचा सत्कार केला.

## इंग्रजी शाळांमधील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता द्या

**शिक्षक परिषदेची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी**

आरंभ मराठी । धाराशिव

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत वैयक्तिक मान्यता देण्यात याव्यात अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात गुरुवारी (दि.२४ ) संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक परिश्रमपूर्वक अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्नरत असतात. त्यांच्या सेवेस संरक्षण मिळावे याकरीता जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडून त्यांना वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यात याव्यात. तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांची आरटीई प्रतिपूर्ती देयके संबंधित शाळांना तात्काळ अदा करण्यात यावीत. तसेच अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव वेतन अनुदानाचा टप्पा वितरण करण्याबाबत शासन आदेश लागू करण्यात यावा. तसेच एक नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त व एक नोव्हेंबर २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. यांसह अनेक महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. मागण्या त्वरित मान्य न झाल्यास महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर उमाकांत कुलकर्णी, नवनाथ केंद्रे, सुनिल काळे , दयानंद चव्हाण, नवनाथ गुरमे, अरविंद गोरठेकर, राहूल पवार, वाघंबर बाजुळगे, राहूल निकम, भगवंत बिरादार, राहूल वेदपाठक, किशोर जोशी, समाधान वाघमारे आदींच्या स्वाक्षरी आहेत.



## वडिलोपार्जीत मिळकतीचा हिस्सा मिळावा या मागणीसाठी भूम तहसील कार्यालयासमोर तरुणाचा आत्मदहनाचा प्रयत्न



आरंभ मराठी । भूम

वडिलोपार्जित मिळकतीमधील वारसा हक्काने हिस्सा न देता धमकी देऊन नातेवाईक हक्कावंचित ठेवत आहेत या प्रकरणात प्रशासनाने सहकार्य करावे या मागणीसाठी भूम तहसील कार्यालयासमोर एका तरुणाने सोमवारी (दि.२८) आत्मदहनाचा प्रयत्न केला. दत्तात्रय दगडू मुंडे असे आत्मदहन करणाऱ्या तरुणाचे नाव असून, वेळीच पोलीस धावले म्हणून अनर्थ टळला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक २२ एप्रिल रोजी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात दत्तात्रय दगडू मुंडेनी नमूद केले होते की, तो हिवर्डा तालुका भूम येथील रहिवासी असून वडिलांनी दोन महिलेशी घरोबा केला होता. यामध्ये दोन्ही महिलांना मुले झाली. कालांतराने एका पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतरही कुटुंब प्रमुखाचा मृत्यू झाला. त्यामुळे दत्तात्रय यांना उपजीविकेसाठी भटकंती करावी लागली. वडिलोपार्जित मिळकतीमध्ये हक्क मिळावा यासाठी नातेवाईकाकडे तसेच सावत्र भावाकडे मागणी केली असता, धमकवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी प्रशासनाने लक्ष घालावे यासाठी त्यांनी दिनांक १० एप्रिल रोजी उपोषण देखील केले होते. परंतु, त्याचीही दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला. या सर्व प्रकाराला कंटाळून दत्तात्रय यांनी सोमवारी तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

## तेर येथील कुस्तीच्या आखाड्यात कोंडच्या प्रशांत जाधवने मारली बाजी

**आखाड्यात २७० मल्लांची दंगल**





आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथील थोर संतशिरोमणी श्री संत गोरोबा काकांच्या ७०८ व्या समाधी सोहळ्यानिमित्त तेर ग्रामपंचायत व संत गोरोबाकाका व शिवमंदीर समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत कोंड येथील प्रंशात जाधव यांनी बाजी मारली. त्यांनी प्रतीस्पर्धी पैलवान सोमनाथ माने यास आस्मान दाखवून मैदान मारले. दिनांक २७ एप्रील रोजी यात्रेतील मातीच्या फडावर या कुस्त्या घेण्यात आल्या. या सामन्यात २७० मल्लानी सहभाग नोंदविला होता. सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे, ग्रामपंचायत सदस्य व जेष्ठ पैलवान यांच्या हस्ते कुस्तीच्या फडाचे उदघाटन झाले. यावेळी कुस्तीच्या फडातील शेवटची १५ हजार रुपयांची मानाची कुस्ती कोंड येथील पैलवान प्रशांत जाधव व तेर येथील पैलवान सोमनाथ माने यांच्यात झाली. यामध्ये पै प्रशांत जाधव यांनी सोमनाथ माने यास कडवी झुंज देत कुस्ती जिंकली. यावेळी सामन्यात कुस्तीचे पंच म्हणून पै. भागवत भक्ते, पै. मारुती इंगळे, शामराव गायके, राजेंद्र पसारे, संजय जाधव, मंझूर तांबोळी यांनी काम पाहिले. लातूर, धाराशिव, तेर व परिसरातील लहान मोठे मल्ल या स्पर्धेसाठी तेरमध्ये दाखल झाले होते. कुस्तीच्या फडात थरारक चितपट डाव पहायला मिळाले. दुसरी कुस्ती राहूल शिंदे तर तिसऱ्या क्रमांकाची कुस्ती शिराढोण येथील विजय ठोंबरे यांनी जिंकली. पहिली कुस्ती १५ हजार रूपये, दुसरी ११ हजार रूपये तर तिसरी कुस्ती ७ हजार रूपयाची लावण्यात आली होती. यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी, अजीत कदम, अविनाश आगाशे ,नवनाथ पसारे, नामदेव कांबळे, राम कोळी, किशोर काळे, अजीत कदम, संजय लोमटे, रतन नाईकवाडी, धनंजय आंधळे, अभिमान रसाळ, हरी भक्ते, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे यांच्यासह ग्रामस्थ, कुस्ती प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरूम शहरातील स्वस्त धान्य दुकानांतील गैरव्यवहाराबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आरंभ मराठी । मुरूम

मुरुम शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांकडून सर्वसामान्य नागरिकांची लूट सुरू असून, नागरिकांना शासनाने दिलेले धान्य न देता परस्पर गहाळ केल्याचा आरोप करत शनिवारी (ता.२६) रोजी ईमेल द्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले. ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे धाराशिव जिल्हाध्यक्ष कॉम्रेड लखन भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, अनेक महिन्यांपासून काही राशन दुकानदार नागरिकांना चुकीच्या कारणांनी धान्य नाकारत आहेत. ''तुमचं राशन बंद झालं आहे'' अशा धमक्या देऊन सर्वसामान्य लोकांना भीती घातली जात असून, त्यांच्या हक्काचे धान्य लाटले जात आहे. यासोबतच त्यांनी दोन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत त्यात प्रामुख्याने शासनाने दिलेले बायोमेट्रिक यंत्र वापरण्यात अपयशी ठरणाऱ्या दुकानदारांवर तातडीने कारवाई करावी, वृद्ध नागरिकांचे डोळे व हातांचे बायोमेट्रिक फेल झाल्यास त्यांच्या धान्य वितरणासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. कॉम्रेड लखन भोंडवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, या प्रकरणात गंभीर दखल घेऊन मुरूम शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व त्यांच्या दुकानांचे परवाने रद्द करावेत.या निवेदनामुळे सामान्य नागरिकांच्या समस्या शासनाच्या लक्षात आल्या असून, या प्रकरणात काय कार्यवाही होते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

